# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक १४.०७.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून ५,७०६/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९८९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८२,१००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, एल—७/३४, विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॉलनी, रिज रोड, रघुजी नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी प्रमोद रुखबसाव भुसारी वय ६४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह पनवेल येथे गेले असता, दिनांक १३.०६.२०२६ चे ०१.३० वा. ०३.०० वा. चे दरम्यान, दोन अज्ञात अनोळखी इसम यांनी फिर्यादीचे घराचे कंपाऊंडमध्ये प्रवेश करुन घराचे मागील दार तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील आलमारीमधील रोख ७०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व २० हातघड्याळी असा एकुण किंमती ३,४४,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत बाल हनुमान मंदीराजवळ अभिलेखावरील मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा आरोपी ईसम हा अॅक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४९ बी.जी. ६१११९ ने संशयीतरित्या आपलेसोबत बॅग घेवून जातांना दिसून आला. त्याचा पाठलाग करून, ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव शेख सोहेल उर्फ भांजा शेख मुक्तार वय २३ वर्षे, रा. मोठा ताजबाग, यासीन प्लॉट, समोसा ग्राऊंड, मच्छी ताज किराणा दुकानजवळ, सक्करदरा, नागपुर असे सांगितले. पंचासमक्ष त्याचे जवळील बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये पांढऱ्या धातूचे दागिने, वेगवेगळ्या कंपनीच्या ब्रॅण्डेड घड्याळी ३२ नग असा मुद्देमाल मिळून आला. त्यास मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे इमरान हुसैन रशीद हुसैन, वय २० वर्षे, रा. उस्मानीया मस्जीद जवळ, हसनबाग, नंदनवन याचेसह संगणमताने करून, त्यातील मुद्देमाल असल्याचे कबूल केले. आरोपीचे ताब्यातुन पांढऱ्या धातूचे दागिने,

वेगवेगळ्या कंपनीच्या ब्रॅण्डेड घड्याळी, लेदर बॅग व अॅक्टीवा मोपेड असा एकुण १,६५,७९९/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उपायुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार केली.



**३) सदर पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे, अवैद्यरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १२.०७.२०२६ रोजी, सदर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना पराठा चौक, रेसीडेन्सी रोड, सदर येथे टाटा सुपर एक्स मालवाहु क्र. एम.एच.१४ डी.एम.९४२३ वाहन भरधाव वेगाने व संशयीतरित्या जातांनी दिसून आले. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग करून, वाहन थांबविले. वाहन ईसमांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव १) मोहम्मद फैजान कुरेशी, वय ३६ वर्षे, रा. गड्डीगोदाम, मस्जीद जवळ, सदर, नागपूर तसेच, त्याचा साथीदार याने २) मुस्ताख खान बकर खान, वय २१ वर्षे, रा. पंजाबी लाईन, जरीपटका, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये लहान मोठी एकुण ०७ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता बांधून ठेवल्याचे दिसून आले. आरोपींना जनावरांबाबत विचारणा केली असता, कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे त्यांनी सांगीतले. आरोपींचे ताब्यातून लहान मोठी ०७ गोवंशीय जनावरे व टाटा सुपर एक्स मालवाहु असा एकुण किंमती अंदाजे ३,१५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे सदर येथे आरोपींविरूध्द कलम ५, ५(ब), ९, ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३, ११(१) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० सहकलम ११८, ११९ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहें. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि क्र.०२), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य.जरीपटका विभाग), वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. निकेतन किल्लेदार, पोहवा. मोहनसिंग, पोअं. पंकज नंदेश्वर व ज्ञानेश्वर वाकोडीकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे ईमामवाडा :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, प्लॉट नं. ८७, राजाबाक्षा, मेडीकल चौक, ईमामवाडा, नागपूर येथे राहाणाऱ्या फिर्यादी श्रीमती पार्वतीबाई बकारामजी हनवते, वय ७७ वर्षे यांचा नातेवाईक आरोपी नामे कमलेश गणपत हनवते, रा. १८३/४, क्वॉर्टर नं. १८, सोमवारी पेठ, ई/पी/एफ कार्यालय मागे, नागपूर याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून, त्याने दिनांक ०१.०१.२०२३ ते १२.०७.२०२६ रोजी दरम्यान, फिर्यादीस 'कमी किमतीत चांगला प्लॉट घेवून देतो' असे आमिष देवुन, फिर्यादीकडून रोख ६,००,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी १४ तोळे असा एकुण १०,४७,०००/—रू. मुद्देमाल घेतला. परंतु, आरोपीने फिर्यादीस कोणताही प्लॉट न दिला नाही. फिर्यादीने आरोपीस पैसे परत करण्याबाबत म्हटले असता, त्याने फिर्यादीस पैसे परत न करता जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून, त्यांची आर्थिक फसवणूक केली. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे मसपोनि. राजश्री चंद्रापूरे ८९७५४६४११८ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४), ३५१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

यापुर्वीसुध्दा पोलीस ठाणे सक्करदरा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३०८(५), ३५२, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान आरोपीने नागपूर शहरातील अनेक जणांची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपीस गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. आरोपी हा सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

**<u>मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. ०४) मार्फतीने जनतेस आवाहन</u> :—** नागपूर शहरातील जनतेला याद्वारे आवाहन करण्यात येते की, अशाप्रकारे नमुद आरोपीने 'कमी किमतीत प्लॉट मिळवून देण्याचे' आमिष दाखवुन, कोणाचीही फसवणुक केलेली असल्यास, त्यांनी मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. ०४) श्रीमती रश्मीता राव यांचे कार्यालय तसेच, पोलीस ठाणे ईमामवाडा व सक्करदरा येथे संबंधीत कागदपत्रांसह प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**<u>२) पोलीस ठाणे कळमना :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १४.०७.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांना खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे हद्दीत पावनगाव रोड, ताज नगर येथील देशी दारू भट्टीजवळ रिजवान खान नावाचा ईसम शस्त्र हातात घेवुन, धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून पोलीस नमुद ठिकाणी गेले असता, तेथे त्यांना मिळालेल्या एक ईसम हातात लोखंडी चाकू घेवुन धुमधाम करतांना समक्ष दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेवुन, निशस्त्र केले. आरोपीस त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव रिजवान सुभान खान, वय ३३ वर्षे, रा. का.प. लक्ष्मी नगर, रजा रिजामी मस्जीद जवळ, कळमना, ह.मु.— ताज नगर, सारीक खान याचे घरी किरायाने, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू किंमती ५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन धूमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. प्रमोद कंगाले यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** सचिन रामकृष्ण सुखदेवे, वय ४० वर्षे, रा. ग्रामीण पोलीस मुख्यालय समोर, ठवरे कॉलोनी, प्लॉट नं. ९४, किशोर सोमकुवर यांचे घरी किरायाने, जरीपटका, नागपूर हे दिनांक १६.०६.२०२६ चे ११.०० वा. पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— हिरव्या रंगाची टि—शर्ट व सिमेंट रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



सचिन

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**